अर्धसाप्ताहिक

# ब्रम्हपुरी समाचार

संपादक अशोक भैया

RNI No. MAHMUL/2016/69789

E-Mail ID : bramhapurisamachar@gmail.com

Postal Regd. No. G2/47/CHD-283/2023-25

गुरूवार, दि. १० जुलै २०२५ | वर्ष १० वे | अंक ४९ वा | ब्रम्हपुरी | पाने ६ | किंमत २ रूपये

## तालुक्यात पावसाचा कहर, हजारो हेक्टर शेती पाण्याखाली

### नदीकाठच्या गावांत पावसाचे पाणी शिरले, 'लाडज'चा संपर्क तुटला

ब्रम्हपुरी/का.प्र.

मंगळवारला आलेल्या मुसळधार पावसामुळे ब्रम्हपुरी तालुक्याला झोडपून काढले आहे. त्यामुळे अनेक ठिकाणी पूरसदृश्य परिस्थिती निर्माण झाली असून जनजीवन विस्कळीत झाले आहे. ब्रम्हपुरी तालुक्यातील लाडज गावाचा जनसंपर्क तुटला असून, पिंपळगांव, अर्‍हेर नवरगांव, चिखलगावात पूराचे पाणी शिरले.

विदर्भात पावसाने जोर पकडला असून, ब्रम्हपुरी तालुक्यात अतिमुसळधार पाऊस झाला आहे. दोन दिवस झालेल्या पावसाच्या तडाख्यामुळे तालुक्यातील अनेक गावातील नदी-नाले ओसांडून वाहत आहेत. त्यामुळे वडसा - ब्रम्हपुरी, आवळगांव - गांगलवाडी, कन्हाळगांव - ब्रम्हपुरी, ब्रम्हपुरी - चांदगांव, दुधवाही -ब्रम्हपुरी, पारडगाव - ब्रम्हपुरी या रस्त्यावरील वाहतुक प्रभावित झाली आहे. गोसेखुर्द धरणाचे २१ दरवाजे २.५ मीटरने व १२ दरवाजे ०२ मीटरने उघडले आहे. त्यामुळे गोसेखुर्द धरणातील पाण्याचा विसर्ग १५१२७ क्युमेक्स ने वाढविण्यात आला आहे. परिणामी वैनगंगा नदी २४८ मीटरच्या वर धोक्याच्या पातळी वरून वाहत आहे. पूराचे पाणी तालुक्यातील पिंपळगांव भो. येथील जेटूची महाराज चौक, अर्‍हेर नवरगांव, चिखलगांवात शिरले आहे. पावसाच्या तडाख्याने रणमोचन, आवळगांव व इतर नदीकाठच्या गावातील घरे क्षतिग्रस्त झाले आहे.



(पावसाच्या पाण्यामुळे क्षतीग्रस्त झालेले घर) (पूर परिस्थितीचा आढावा घेतांना तहसिलदार सतीश मासाळ)

पिंपळगांव भो. येथे बचाव पथक व दोन बोट्स प्रशासनाने तैनात केले आहेत. पिंपळगाव भो. येथील पूरबाधीत नागरिकांना प्रशासनाने सुरक्षित स्थळी हलविले आहे. सततच्या मुसळधार पावसामुळे तोरगांव खुर्द, नांदगांव, अर्‍हेर नवरगांव, पिंपळगांव, चिखलगांव येथील हजारो एकर शेती पाण्याखाली आली आहे. त्यामुळे शेतकर्‍यांचे अतोनात नुकसान झाले आहे.

पूर स्थिती निर्माण झालेल्या नदीकाठावरील बाधीत गावातील नागरिकांना राज्य

(उर्वरित पान क्र. ६ वर)

## न.प. प्रशासन कोलमडले, शहरात चिखलच चिखल

ब्रम्हपुरी/का.प्र.

ऐन पावसाळ्यात न.प. प्रशासन कोलमडले असून शहरात सर्वत्र चिखलाचे साम्राज्य पसरले आहे. नियोजनशून्यतेमुळे सामान्य नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे. विविध वार्डातून नागरिकांनी मुख्याधिकार्‍यांना निवेदन देऊन सद्य परिस्थितीची जाणिव करूनदेखील प्रशासनाने प्रभावी उपाय योजना न केल्याने नागरिकांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. चिर-निद्रेतून न.प. प्रशासन केव्हा जागे होणार, असा प्रश्न उपस्थित झाला आहे.



(रस्त्यावर पडलेला खड्डा) (चिखलात रूतलेली स्कुलबस) (रस्त्यावरील खड्डा)

पावसाळ्यात नाल्या तुडुंब भरून वाहतात, हे माहित असूनदेखील पावसाळ्यापूर्वी नाल्यांचा उपसा करण्यात आला नाही. त्यातच भर पडली ती भूमीगत गटार बांधकामाची. सदर कामावर न.प.चे अक्षम्य दुर्लक्ष आहे. शहरातील अनेक रस्ते मधोमध खोदल्या गेली आहे. पाईप लाईन टाकल्यावर खड्डे बुजवले गेले नाहीत. पावसाच्या पाण्याने खोदकामाची माती चिखलमय झाली आहे. रस्त्यावर चिखलच चिखल असे चित्र निर्माण झाले आहे. पादचार्‍याने यातून वाट कशी काढायची! चिखलमय रस्त्यातूनच शाळकरी मुले पाठीवर दप्तराचे ओझे घेऊन जात असतील व घसरून पडली आणि अपघात झाल्यास जबाबदार कोण! वाहनधारकांनीसुध्दा चिखलातून मार्ग काढणे म्हणजे महापराक्रम म्हणावा लागेल. एवढेच नाही तर स्कूल बसेससुध्दा चिखलात रूतून बसल्याच्या घटना समोर आल्या आहेत. सर्वत्र पसरलेल्या चिखलामुळे अपघात होण्याची शक्यता बळावली आहे. भूमीगत गटार योजनेचे चेंबर बांधतांना गुणवत्तेकडे दुर्लक्ष झाले आहे. तळाला सिमेंट काँक्रीट टाकण्याऐवजी फक्त वाळू सिमेंटचा वापर करण्यात आला. तळ मजबूत नसल्याने चेंबर केव्हाही कोसळू शकतात व अपघातदेखील होऊ शकतो. याबाबत न.प. संपूर्णपणे उदासिन आहे. न.प.ला नागरिकांच्या जीवाची पर्वा नाही.

चिखलमय रस्ते त्वरीत दुरूस्त करण्याची मागणी सर्व स्तरातून होत आहे. शिवसेनेने जिल्हाधिकार्‍यांना दिलेल्या निवेदनातून परिस्थितीचे गांभीर्य समजावून सांगितले. तसेच भाजपच्या वतीने नगर परिषदेवर चिखलफेक आंदोलन करून प्रशासनाला जागे करण्याचा प्रयत्न करण्यात आला. परंतु न.प. प्रशासन गेंडयाची कातडी पांघरून असल्याने कोणतीही उपाययोजना करण्यात आली नाही.

सध्यातरी न.प.करीता परिस्थिती हाताबाहेर गेल्याचे चित्र निर्माण झाले आहे. भूमिगत गटार योजनेचे काम थांबविता येत नाही, पावसाळ्यात रस्ता डागडुजीचे कामसुध्दा व्यवस्थित करता येणार नाही. त्यातच राष्ट्रीय महामार्गाच्या कामानेदेखील नागरिकांना जेरीस आणले आहे. परंतु त्यावरसुध्दा न.प.चे कोणतेही नियंत्रण नाही. एकंदरीत न.प.ने नागरिकांना वार्‍यावर सोडल्याचे स्पष्ट दिसत आहे.



## संपादकीय...

# दोन दलाई लामांची निवड

दलाई लामा हे तिबेटी बौद्ध धर्मातील सर्वोच्च आध्यात्मिक गुरू आहेत तसेच ते जागतिक स्तरावर शांततेचे, अहिंसेचे आणि करुणेचे प्रतीक मानले जातात. परंपरेनुसार, दलाई लामा हे अवलोकितेश्वर या करुणेच्या बोधिसत्त्वाचे पुनर्जन्म मानले जातात. अनेक शतकांपासून तिबेटी बौद्ध परंपरेनुसार, एका दलाई लामाच्या निधनानंतर त्यांचा पुढील जन्म झालेला मुलगा शोधून काढण्याची प्रक्रिया पार पडते. मात्र, आता ही परंपरा चीन सरकारच्या हस्तक्षेपामुळे तसेच अनेक राजकीय आणि सामाजिक अडचणींमुळे धोक्यात आली आहे. सध्या १४ वे दलाई लामा वयस्कर झाले आहेत, त्यामुळे नव्या दलाई लामाची निवड हा एक जागतिक चर्चेचा विषय बनला आहे.

तिबेटी बौद्ध धर्मानुसार, दलाई लामा मृत्यूनंतर पुनर्जन्म घेतो. त्यांचा नव्याने जन्म झालेला बालक शोधण्यासाठी ज्येष्ठ भिक्षु आणि धार्मिक अधिकारी एकत्र येतात. त्यासाठी स्वप्ने, दृष्टांत, धार्मिक संकेत आणि निसर्गातील चिन्हांचा अभ्यास केला जातो. जेव्हा असा एक संभाव्य बालक सापडतो, तेव्हा त्याची चाचणी घेतली जाते. या चाचणीत त्याला मागील दलाई लामाचे खासगी साहित्य ओळखण्यास सांगितले जाते. योग्य चाचणीनंतर त्याला अधिकृतपणे दलाई लामा म्हणून मान्यता दिली जाते आणि बौद्ध तत्त्वज्ञानाचे शिक्षण दिले जाते. ही प्रक्रिया केवळ धार्मिक नसून तिबेटी संस्कृती व ओळखीच्या सातत्यासाठी अत्यंत महत्त्वाची मानली जाते. मात्र, आता यात राजकीय हस्तक्षेप होताना दिसतो आहे. चीनने दावा केला आहे की त्यांनाच सर्व तिबेटी धार्मिक गुरूंच्या पुनर्जन्मास मान्यता देण्याचा अधिकार आहे. त्यांनी 'गोल्डन अर्न' या ऐतिहासिक प्रथेस दुजोरा देत असे म्हटले आहे. या पार्श्वभूमीवर, चीन स्वतःचा एक 'दलाई लामा' नेमण्याचा विचार करत आहे, जो त्यांच्या राजकीय धोरणाला पोषक ठरेल. मात्र, विद्यमान दलाई लामा यांनी वारंवार सांगितले आहे की चीन सरकारने निवडलेला दलाई लामा त्यांना मान्य नसेल, कारण तो बेकायदेशीर असेल. आपला उत्तराधिकारी चीनबाहेर म्हणजे स्वतः निर्वासित स्थितीत असलेल्या भारतात अथवा दुसऱ्या देशातील असेल, असेही त्यांनी ठामपणे सांगितले आहे.

चीन व दलाई लामांच्या या भूमिकेमुळे भविष्यात दोन वेगवेगळ्या दलाई लामांची शक्यता निर्माण झाली आहे. एक तिबेटी निर्वासित सरकार आणि बौद्ध अनुयायांनी मान्य केलेला आणि दुसरा चीन सरकारकडून नेमलेला. याच कारणास्तव पारंपरिक प्रक्रिया केवळ राजकीय नव्हे, तर सामाजिकदृष्ट्याही धोक्यात आली आहे. अनेक ज्येष्ठ भिक्षु वृद्ध झाले आहेत किंवा निवर्तले आहेत, तर निर्वासित तिबेटी समाज जगभर विखुरलेला आहे. त्यामुळे नव्या दलाई लामाचा शोध ही प्रक्रिया अधिक कठीण झाली आहे. दलाई लामा हे केवळ धार्मिक गुरु नसून, तिबेटी संस्कृती, स्वातंत्र्य आणि अस्मितेचे प्रतीक आहेत. त्यामुळे त्यांचा उत्तराधिकारी निवडीचा प्रश्न हा केवळ आध्यात्मिक नाही, तर तिबेटी लोकांच्या भविष्याशी संबंधित राजकीय संघर्ष बनला आहे. दलाई लामाचा पुनर्जन्म भारतात किंवा चीनबाहेर झाला असेल तर ती व्यक्ती निर्वासित तिबेटी समाजात मान्यता पावेल, पण चीन त्याला संमती देणार नाही, हे स्पष्ट दिसते आहे. चीनने स्वतःचा दलाई लामा नेमल्यास ही निवड जागतिक बौद्ध समाजात मान्य नसणार, हे तर उघड आहे.

धार्मिक नेतृत्वाची जागा लोकशाही तत्त्वांनुसार चालणाऱ्या संस्था घेतात, हा तिबेटी समाजातील एक विचारप्रवाह आहे. दलाई लामा निवडीची परंपरा जपण्यासाठी तिबेटी बौद्ध समाज, जागतिक समुदाय आणि मानवाधिकार संस्थांना एकत्रितपणे प्रयत्न करावे लागतील, दलाई लामांच्या उत्तराधिकाऱ्याचा प्रश्न हा तिबेटी लोकांच्या अस्तित्वाशी, त्यांच्या संस्कृतीच्या टिकावावर आणि धार्मिक स्वातंत्र्याशी निगडित आहे. त्यामुळे पुढील दलाई लामाची निवड केवळ बौद्ध धर्मापुरती मर्यादित राहणार नाही, तर ती जगभरातील लक्ष वेधून घेणारी ऐतिहासिक घटना ठरेल. विद्यमान दलाई लामांच्या पाठीशी भारत सरकार उभे राहणार असून, त्यांच्या इच्छेनुसार उत्तराधिकाऱ्याची निवड योग्य ठरेल, असे सरकारने स्पष्ट केले असले तरी कोणत्याही धार्मिक वादात सरकार पडणार नाही अशी स्पष्ट भूमिका सरकारतर्फे जाहीर करण्यात आली आहे. गेडन फोड्रांग ट्रस्ट ही भारतातील विश्वस्त संस्था आपल्या सूचनेनुसार नव्या दलाई लामाचा शोध घेईल, असे विद्यमान दलाई लामा तेन्शिन ग्यात्सो यांनी पुन्हा स्पष्ट केल्यामुळे दोन व्यक्ती दलाई लामा म्हणून पुढे येण्याची शक्यता वाढली आहे.

## स्व. किसनलालजी मदनगोपालजी भैया फाउंडेशनचा स्तुत्य उपक्रम

# ने.हि. कन्या विद्यालयातील १९९ विद्यार्थीनींना गणवेश वाटप

ब्रम्हपुरी/का.प्र.

स्व. किसनलालजी मदनगोपालजी भैया फाउंडेशन दरवर्षी गरीब व गरजू विद्यार्थिनींना



गणवेश वाटप करीत असते. नेवजाबाई हितकारणी कन्या विद्यालय ब्रह्मपुरी येथे दिनांक २ जुलै २०२५ ला गणवेश वितरण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. प्रसंगी विद्यालयातील वर्ग पाचवीच्या १९९ विद्यार्थीनींना गणवेश वाटप केला. सदर स्तुत्य उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

गणवेश वितरण कार्यक्रमाचे अध्यक्ष तथा गणवेश वितरक म्हणून अशोकजी भैय्या साहेब सचिव, नेवजाबाई भैय्या हितकारिणी शिक्षण संस्था, ब्रह्मपुरी उपस्थित होते. प्रमुख अतिथी म्हणून सुभाषजी बजाज सदस्य, नेवजाबाई भैय्या हितकारिणी शिक्षण संस्था ब्रह्मपुरी, बनपूरकर मॅडम मुख्याध्यापिका ने.ही. कन्या विद्यालय, उपमुख्याध्यापक निखारे सर, पर्यवेक्षिका खंडाते मॅडम उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात प्रतिमांचे पूजन व मान्यवरांना पुष्पगुच्छ देऊन करण्यात आली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक निखारे सर यांनी केले. इयत्ता पाचवीच्या एकूण १९९ विद्यार्थीनींना स्व. किसनलालजी मदनगोपालजी भैया फाउंडेशन तर्फे गणवेश वितरित करण्यात आले.

याप्रसंगी अध्यक्षीय भाषणात अशोकजी भैय्या यांनी गणवेशाचे महत्त्व, गरज व भविष्यात प्राविण्य प्राप्त करण्यासाठी कठोर परिश्रम घ्यावे लागतात असे सांगितले. प्रमुख अतिथी प्रा. सुभाष बजाज सर यांनी विद्यार्थिनींना ध्येय निश्चित करा व त्यानुसार अभ्यासाचे नियोजन करा असे सांगितले. मुख्याध्यापिका बनपूरकर मॅडम यांनी शिस्तीचे पालन करावे याविषयी मार्गदर्शन केले. पर्यवेक्षिका खंडाते मॅडम यांनी विद्यार्थिनींना स्वच्छता विषयी मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे संचालन धांडे मॅडम यांनी तर आभार प्रदर्शन बावनकुळे मॅडम यांनी केले. कार्यक्रमाला शाळेतील सर्व शिक्षक शिक्षिका व विद्यार्थीनी उपस्थित होत्या.

# विविध समस्यांबाबत शिवसेनेचे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन



ब्रम्हपुरी/का.प्र.

ब्रम्हपुरी येथील स्थानिक पदाधिकाऱ्यांनी जिल्हाधिकारी विनय गौडा यांची ब्रम्हपुरी दौऱ्यादरम्यान भेट घेत ब्रम्हपुरी शहरातील विविध समस्यांविषयी चर्चा करून त्या संदर्भात निवेदन दिले.

नगर परिषद ब्रम्हपुरी द्वारे शहरात चुकीच्या पद्धतीने विकासाचे काम सुरु आहे. प्रत्येक वार्डातील गटरलाईन टाकण्यात आले. यामुळे चांगल्या व पक्क्या रस्त्यांची तोडफोड करुन निकृष्ठ दर्जाचे चुकीच्या पद्धतीने काम करण्यात आले आहे. तसेच शहरात डुकरांचा, कुत्र्यांचा व मोकाट जनावरांचा उपद्रव वाढलेला आहे.भर दिवसा जनावरे रस्त्यावर बसून असतात. यामुळे अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

पावसाळा सुरू होण्याचे अगोदर ब्रम्हपुरी शहरात कुठलिही साथ उदभवू नये, याकरीता नाली सफाई ची उपयोजना करावी. शहरातील मार्गांची सफाई करण्यासाठी १५ कामगार व नाली साफ करण्यासाठी ३५ कामगार आहेत. ब्रम्हपुरी शहराचा व्यास बघता इतक्या कमी कामगारांवर सफाई ची जबाबदारी असल्याने शहरात घाणीचे साम्राज्य पसरले आहे.

ब्रम्हपुरी शहरातील ४ ते ५ वॉर्ड हे अजून ही गावठाण मधेच आहे. अजून पर्यंत सिटी सर्वेच काम झालेले नसल्याने ब्रम्हपुरीकर कित्येक सरकारी योजने पासून वंचित आहेत आदी मागण्यांचे निवेदन जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले. मागण्या मान्य न झाल्यास १५ जुलैपासून शिवसेना तालुका व शहर ब्रम्हपुरी च्या वतीने रस्त्यावर उतरून आंदोलन करेल, असे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

निवेदन देतांना शिवसेना उपजिल्हा प्रमुख संजय पारटवार, शिवसेना तालुका प्रमुख नरेंद्र नरड, शिवसेना उपतालुका प्रमुख कवळू पिंपळकर, शिवसेना शहर प्रमुख अमोल माकोडे, विधानसभा समन्व्यक मिलिंद भणारे, आकाश शेंद्रे युवा सेना तालुका प्रमुख गणेश लांजेवार, आशिष गांडलेवार, चेतन गुंजेकर व शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## विनोदिनी

संता बड़ी देर से अपने कमरे में कुछ ढूंढ रहा था...
परेशान होकर उसकी पत्नी बोली–
तुम इतनी देर से क्या ढूंढ रहे हो?
संता – हिडन कैमरा !
पत्नी – तुम्हें ऐसा क्यों लगा इस कमरे में हिडन कैमरा लगा है?
संता – अगर यहां हिडन कैमरा नहीं लगा होता तो टीवी में आ रहे इस आदमी को कैसे पता होता कि....
हम स्टार प्लस देख रहे हैं...
बार-बार 'आप देख रहे हैं स्टार प्लस' क्यों बोल रहा है...?'

# कार्यालयीन सुधारणा कार्यक्रमात ब्रम्हपुरी रुग्णालय विभागातून दुसऱ्या क्रमांकावर

ब्रह्मपुरी/का. प्र.

१०० दिवसांची कार्यालयीन सुधारणा विशेष मोहिम ही राज्य, विभाग, जिल्हा व तालुका स्तरांवरील अनेक शासकीय कार्यालयांमध्ये यशस्वीपणे राबविण्यात आली होती. यात नागपूर विभागातून उपजिल्हा रुग्णालय या गटातून उपजिल्हा रुग्णालय ब्रह्मपुरी यांनी द्वितीय क्रमांक मिळवला. उपजिल्हा रुग्णालय ब्रह्मपुरीच्या विशेष कामगिरीबद्दल चंद्रपूर जिल्ह्याचे पालकमंत्री प्रा. अशोक उईके तथा चंद्रपूर जिल्ह्याचे जिल्हाधिकारी विनय गौडा यांच्या हस्ते उपजिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधिक्षक डॉ. प्रितम



खंडाळे यांना प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात आले. सदर कार्यक्रम जिल्हाधिकारी कार्यालय येथील नियोजन भवनात पार पडला.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या दूरदृष्टीतून राज्यातील शासकीय कार्यालयांना शिस्त लावणे, नागरिकांची कामे जलदगतीने पूर्ण होणे आणि शासन-प्रशासन व नागरिकांमधील विश्वास वृद्धिंगत होणे या उद्देशाने १०० दिवसांची कार्यालयीन सुधारणा मोहिम कार्यक्रम हाती घेण्यात आला होता. १०० दिवसांची कार्यालयीन सुधारणा विशेष मोहिम ही राज्य, विभाग, जिल्हा व तालुका स्तरांवरील १२,५०० शासकीय कार्यालयांमध्ये यशस्वीपणे राबविण्यात आली होती. यात नागपूर विभागातून उपजिल्हा रुग्णालय या गटातून उपजिल्हा रुग्णालय ब्रह्मपुरी यांनी सदर मोहिमेत सहभाग नोंदविला होता. यात उपजिल्हा रुग्णालय ब्रह्मपुरी यांनी द्वितीय क्रमांक पटकाविला. त्याच्या कार्याचा गौरव सोहळा ०५ जुलै २०२५ रोजी नियोजन भवन जिल्हाधिकारी कार्यालयात पार पडला. यावेळी चंद्रपूर जिल्ह्याचे पालकमंत्री प्रा. अशोक उईके तथा चंद्रपूर जिल्ह्याचे जिल्हाधिकारी विनय गौडा यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. नागपूर विभागातून उपजिल्हा रुग्णालय या गटातून उपजिल्हा रुग्णालय ब्रह्मपुरी यांनी द्वितीय क्रमांक प्राप्त केल्यामुळे तसेच तालुकास्तरावर केलेल्या उत्कृष्ट कार्याबद्दल चंद्रपूर जिल्ह्याचे पालकमंत्री प्रा. अशोक उईके तथा चंद्रपूर जिल्ह्याचे जिल्हाधिकारी विनय गौडा यांच्या हस्ते उपजिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधिक्षक डॉ. प्रितम खंडाळे यांना प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात आले.

सदर यशस्वीतेसाठी जिल्हा सामान्य रुग्णालय चंद्रपूरचे जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. महादेव चिंचोळे यांचे वेळोवेळी मार्गदर्शन लाभले. प्रसंगी उपजिल्हा रुग्णालय प्रमुख येथील वैद्यकीय अधीक्षक डॉक्टर निखिल डोकरीमारे, डॉ.संभाजी ठाकर, डॉ. श्रीकांत नागमोती, डॉ. श्रीकांत कामडी प्रामुख्याने उपस्थित होते.

# वि.दा. सावरकर वाचनालय, खंडाळा तर्फे शालेय विद्यार्थ्यांना नोटबुकचे वितरण



ब्रम्हपुरी/का.प्र.

खंडाळा येथील वि.दा.सावरकर सार्वजनिक वाचनालय व नवयुवकांकडून जि.प. प्राथमिक शाळा खंडाळा येथील वर्ग १ते ४ मधील सर्व विद्यार्थ्यांना नोटबुक व पेनचे वाटप करण्यात आले.

गावातील होतकरू व उच्च ध्येय बाळगणारे नवयुवक यांनी वाचनालयाच्या माध्यमातून विविध उपक्रम राबविण्याचे ठरविले असून सदर वाचनालय बौद्ध विहारात नियमित सुरु असून त्यात अनेक तरुण स्पर्धा परिक्षेची तयारी करीत आहेत. याचाच एक भाग म्हणून प्राथमिक स्तरावरील विद्यार्थ्यांना भविष्यात चांगली संधी निर्माण होण्यासाठी यावर्षीपासून शाळेचे मुख्याध्यापक सुधीर अलोने यांच्या मार्गदर्शनात शालेय विद्यार्थ्यांना मोफत नोटबुक व पेनचे वाटप शाळेत करण्यात आले.

प्रसंगी वाचनालयाचे नवयुवक सदस्य प्रितम वाघधरे पोलीस पाटील, आर्यन राखडे, साहिल जगताप, दीपक राखडे, रोमल कोल्हे, लोकेश दिघोरे यांनी शाळेतील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करुन मोफत नोटबुक व पेनचे वाटप केले. मुख्याध्यापक सुधीर अलोने यांनी या उपक्रमाचे कौतुक करुन पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या. शिक्षक अनिल नाट यानी देणगी दात्यांचे आभार मानले.

# जिल्हास्तरीय जलतरण स्पर्धेत शिवराज मालवींना ६ सुवर्ण

ब्रम्हपुरी/का.प्र.

ऑक्वॉटिक्स असोसिएशन ऑफ चंद्रपूर जिल्हा यांच्या वतीने आयोजित जिल्हास्तरीय जलतरण स्पर्धा दिनांक २९ जून रोजी चंद्रपूर येथील डिस्ट्रिक्ट स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स स्विमिंग पूल मध्ये पार पडली. या स्पर्धेत संपूर्ण चंद्रपूर जिल्ह्यातून १०० हून अधिक जलतरणपटूंनी सहभाग घेतला होता.

ब्रम्हपुरी येथून शिवराज मालवी यांच्या नेतृत्वाखाली १८ जलतरणपटूंनी सहभाग घेतला. सर्व जलतरणपटूंनी शिवराज



मालवी यांच्या मार्गदर्शनाखाली उल्लेखनीय कामगिरी करत एकूण ५० पदके व ट्रॉफी जिंकून ब्रम्हपुरीचे नाव पुन्हा एकदा जलतरण क्षेत्रात सर्वोच्च स्थानावर पोहचवले. त्यांच्या या कौतुकास्पद विजयाबद्दल ब्रम्हपुरीवासीयांनी सर्व जलतरणपटूंचे आणि शिवराज मालवी यांचे अभिनंदन केले.

या स्पर्धेतील विशेष लक्षवेधी बाब म्हणजे ६३ वर्षीय शिवराज मालवी यांनी स्वतः ६ सुवर्ण पदके पटकावली आणि सोबतच्या युवा जलतरणपटूंना प्रोत्साहन देत त्यांच्या आत्मविश्वासात भर घातली. त्यांनी ५० मीटर, १०० मीटर, २०० मीटर फ्री स्टाईल, ५० मीटर व १०० मीटर बॅकस्ट्रोक, तसेच ५० मीटर ब्रेस्टस्ट्रोक स्पर्धांमध्ये यश संपादन केले.

# मानव कुटी जीवन संशोधन केंद्राचे माजी आमदार प्रा. देशकर यांचे हस्ते उद्घाटन

ब्रह्मपुरी/का.प्र.

येथील आचार्य डॉ. संजय हर्षे यांनी सुरू केलेल्या मानव कुटी जीवन संशोधन केंद्र



ब्रह्मपुरीचे उद्घाटन ब्रम्हपुरी विधानसभा क्षेत्राचे माजी आमदार प्रा. अतुल देशकर यांच्या शुभ हस्ते करण्यात आले.

या केंद्रात मानवी जीवनातील सर्व घडामोडींचा व समस्यांचा अचूक वेध घेवून त्यावर उपाय या केंद्रात दिले जाणार आहेत. त्यामध्ये ॲस्ट्रॉलाजी, न्युमरोलॉजी, हिप्पनोसीन, वास्तुविषारद, लोलक विषारद, आर्किटेक्चर, फेस रीडर, नॅचरोपॅथी, योग सायन्स व आयुर्वेद यांच्याद्वारे उपाय दिले जातील. डॉ. हर्षे यांनी पत्नी स्व. जयश्री हर्षे हिच्या ७ व्या स्मृती दिनाप्रित्यर्थ मानव कुटी जीवन संशोधन केंद्र सुरू केले आहे.

उद्घाटना कार्यक्रमप्रसंगी विजय हर्षे गोंदिया, प्रा. संजय लांबे, प्रा. चंद्रकांत विटाळकर, प्रा. बंडु रेहपाडे आरमोरी, अतुल गौरशेट्टिवार, पत्रकार दिलिप शिनखेडे, विलास खरवडे, नानाजी गराडे, अरुण भगत, बाळु भानारकर, मीराबाई करंडेकर लाखांदूर आदींची उपस्थिती होती.

# ब्रम्हपुरीचा सौरभ सी.ए. परीक्षा उत्तीर्ण

ब्रम्हपुरी/का.प्र.

शैक्षणिक, सांस्कृतिक व आरोग्य नगरी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या ब्रम्हपुरी शहरातील ओमनगर येथील सौरभ ढोरे सी.ए. ची परिक्षा उत्तीर्ण झाला आहे.

सौरभने आपले दहावी व बारावीपर्यंतचे शिक्षण ब्रम्हपुरी येथील ख्रिस्तानंद स्कूल ब्रम्हपुरी इथून पूर्ण करून नंतर सीएच्या परीक्षेची तयारी केली व अतिशय मेहनत घेऊन सीए ची अंतिम परीक्षा पास केली.

त्याने आपल्या यशाचे श्रेय शिक्षकवृंद, मोठे बाबा, मोठीआई, आई-वडील, काका-काकू, बहिणभाऊ या घरच्या सर्व मंडळींना व मित्र मंडळी व नातेवाईक यांना दिलेलं आहे. सौरभचे वडील ज्ञानेश्वर सखाराम ढोरे हे सेवानिवृत्त शिक्षक आहेत व आई कल्पना गृहिणी आहे.

# ने.हि. उच्च माध्यमिक विद्यालयात गणवेश वितरण सोहळा उत्साहात संपन्न

## स्व. किसनलालजी मदनगोपालजी भैया फाऊंडेशनचा उपक्रम



ब्रम्हपुरी/का.प्र.

'स्व. किसनलालजी मदनगोपालजी भैया फाउंडेशन, ब्रम्हपुरी' यांच्या वतीने नेवजाबाई हितकारिणी उच्च माध्यमिक विद्यालय, ब्रम्हपुरी येथे नवप्रवेशित विद्यार्थ्यांसाठी गणवेश वितरण सोहळा अतिशय उत्साहात आणि प्रेरणादायी वातावरणात संपन्न झाला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे सचिव अशोकजी भैया होते. प्रमुख अतिथी म्हणून संस्थेचे सहसचिव ॲड. भास्करराव उराडे साहेब, संस्थेचे जेष्ठ सदस्य प्रा. सुभाषजी बजाज सर यांची उपस्थिती लाभली. यात्प्रसंगी विचारमंचावर विद्यालयाचे मुख्याध्यापक के.एम. नाईक सर आणि पर्यवेक्षक प्रा. पी.आर. जिभकाटे सर उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलनाने करण्यात आली. त्यानंतर विद्यालयातील शिक्षिकांनी सादर केलेल्या स्वागतगीताने अतिथी मान्यवरांचे स्वागत करण्यात आले.

प्रास्ताविक भाषणात मुख्याध्यापक नाईक सर यांनी विद्यालयात सुरू असलेल्या विविध उपक्रमांची, विद्यार्थ्यांच्या प्रगतीची आणि 'मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा' यासारख्या विशेष उपक्रमांतील सहभागाची सविस्तर माहिती दिली. त्यांनी विद्यार्थ्यांना शिक्षणासोबत नैतिक मूल्यांचे महत्त्व समजावले. संस्थेचे सहसचिव ॲड. भास्करराव उराडे यांनी विद्यार्थ्यांना कठोर मेहनतीचे महत्त्व सांगताना, जीवनात यशस्वी होण्यासाठी प्रामाणिक प्रयत्नांची आवश्यकता असल्याचे स्पष्ट केले. प्रा. सुभाषजी बजाज सर यांनी विद्यार्थ्यांना गणित या विषयाच्या अभ्यासातील सोप्या मार्गांचे मार्गदर्शन करतांना विद्यार्थ्यांच्या मनातील गणित विषयाची भीती दुर केली व विद्यार्थ्यांनी भावी जीवनात मोठे उद्दिष्ट ठेऊन प्रगती साधावी असा मोलाचा सल्ला दिला.

अध्यक्षीय भाषणात संस्थेचे सचिव अशोकजी भैया यांनी नेवजाबाई भैया हितकारिणी शिक्षण संस्था, ब्रम्हपुरीच्या उदयापासून ते आजवरच्या प्रवासाचा आढावा घेतला. 'ही संस्था कधीकाळी एका छोट्या रोपट्याप्रमाणे होती, आज ती हजारो विद्यार्थ्यांना शिक्षण देणारा वटवृक्ष बनली आहे,' असे ते भावनिक शब्दांत म्हणाले. ते पुढे म्हणाले की, 'कर्मयोगी स्व. मदनगोपालजी भैया यांच्या दूरदृष्टीमुळे समाजातील बहुजन घटकातील विद्यार्थ्यांना शिक्षणाचे समान आणि सुलभ माध्यम उपलब्ध झाले. १९९६ पासून संस्थेच्या वतीने सातत्याने गणवेश वितरणाचा उपक्रम राबवला जात आहे आणि ही परंपरा आजही आम्ही जपतो आहोत.'

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन निशिकांत बोरकर सर यांनी प्रभावीपणे केले, तर आभार प्रदर्शन भावना मेश्राम मॅडम यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी विद्यालयातील सर्व शिक्षकवृंद, शिक्षकेतर कर्मचारीवृंद आणि पालक वर्गाचे विशेष सहकार्य लाभले.

●●●●●●●

## स्थानिक निवडणुका स्वबळावर लढण्याचा रिपब्लिकन पक्षाचा निर्धार

ब्रम्हपुरी/का.प्र.

बॅरि. राजाभाऊ खोब्रागडे यांचे बंधू व रिपब्लिकन पक्षाचे सरसेनानी दिवंगत गिरीशबाबू खोब्रागडे यांचे पुत्र देशक खोब्रागडे या नवतरुणाकडे नेतृत्व पक्षाने बहाल करून राष्ट्रीय अध्यक्ष बनविण्यात आले. त्यांच्या आदेशाचे पालन करीत दिनांक ०५ जुलैला स्थानिक डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालयातील सभागृहात पक्षाची चिंतन बैठक आयोजित करण्यात आली होते. या बैठकीचे अध्यक्ष डॉ.मिलिंद रंगारी हे होते तर प्रमुख मार्गदर्शन म्हणून पक्षाचे महाराष्ट्र प्रदेश सरचिटणीस जीवन बागडे, कार्याध्यक्ष डॉ.देवेश कांबळे, गोपाळराव खोब्रागडे, इंजि. मिलिंद मेश्राम, तालुका अध्यक्ष नरेश रामटेके हे उपस्थित होते.

आयोजित बैठकीत उपस्थित मान्यवरांनी आपले मनोगत व्यक्त केलेत यात आगामी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या सर्व निवडणुकीला सामोरे जाण्याचा सुर निघाला. तसेच बॅरिस्टर राजाभाऊ खोब्रागडे यांच्या शताब्दी वर्ष आहे त्या अनुषंगाने पक्ष वाढीसाठी सभासद नोंदणी अभियान राबवित असून कार्यकर्त्यांनी प्रामाणिक कार्यकर्ते चळवळीत यावे असे आवाहन करण्यात आले. दुसऱ्याच्या घरात जाऊन अपमान करू नका जे आहेत त्यांनी स्वत: आत्मचिंतन करावे आपल्याला खरंच त्या पक्षात स्वाभिमानाचे सन्मानाचे स्थान मिळत आहे का? जे गेलेत त्यांना काम मिळत असेल खान-पान मिळत असेल पण सन्मान मिळत नाही. म्हणून गेलेल्यानी आपल्या स्व:घरी परत येऊन आंबेडकरी चळवळीला गतिमान करावे असेही मान्यवरांनी विचार व्यक्त केलेत.

या बैठकीस शहरातील विविध वॉर्डातील तसेच तालुक्यातील अनेक गावातून असे २०० च्या जवळपास कार्यकर्ते उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रशांत डांगे शहराध्यक्ष ब्रम्हपुरी यांनी केले. सूत्रसंचालन पद्माकर रामटेके तर आभार प्रदर्शन रक्षित रामटेके यांनी केले. बैठकीच्या यशस्वीतेसाठी रक्षित रामटेके, विहार मेश्राम, सुमेध वालदे, मनोज धनवीज, राहुल सोनटक्के, उत्पल नागदेवते यांनी परिश्रम घेतले.

## शासनाकडून उत्कृष्ठतेची पावती

## एसडीओ पर्वणी पाटील यांचा सन्मान



ब्रम्हपुरी/प्रतिनिधी

'१०० दिवसांची कार्यालयीन सुधारणा विशेष मोहिम' ही महाराष्ट्र शासनाच्या वतीने संपूर्ण राज्यातील शासकीय यंत्रणांमध्ये कार्यक्षमतेत सुधारणा व पारदर्शकता आणण्यासाठी राबविण्यात आली. राज्यभरातील एकूण १२,५०० शासकीय कार्यालयांमध्ये ही मोहिम यशस्वीपणे पार पडली. या विशेष मोहिमेत नागपूर विभागातून उपविभागीय अधिकारी, ब्रह्मपुरी हे कार्यालय द्वितीय क्रमांकाने निवडले गेले असून, त्यांच्या कार्यक्षमतेची राज्यस्तरावर नोंद घेत त्यांना चंद्रपूर येथे प्रशस्तीपत्र देऊन गौरव करण्यात आला आहे.

प्रशस्तीपत्र प्रदान करताना चंद्रपूर जिल्ह्याचे पालकमंत्री अशोक उईके, जिल्हाधिकारी विनय गौडा, तसेच इतर मान्यवर अधिकारी व पदाधिकारी उपस्थित होते. कार्यक्रमात ब्रम्हपुरी उपविभागीय कार्यालयाच्या कार्यपद्धतीचे आणि नवाचारांचे कौतुक करण्यात आले.

या यशाचे श्रेय उपविभागीय अधिकारी श्रीमती पर्वणी हर्षा रविंद्र पाटील व त्यांच्या कार्यालयीन चमूला दिले जात असून, त्यांनी अत्यंत कुशलतेने प्रशासनात कार्यक्षम सुधारणा राबवून उपविभागीय पातळीवर नवा आदर्श निर्माण केला आहे. त्यांच्या कार्यालयाने नागरिकाभिमुख सेवांचा वेग, गुणवत्तापूर्ण सेवा वितरण व डिजिटल प्रक्रियांचा प्रभावी वापर या बाबतीत उत्कृष्ट कामगिरी बजावली. या प्रशस्तीपत्राद्वारे शासनाने त्यांच्या कार्याचा गौरव करत, इतर शासकीय कार्यालयांसाठी प्रेरणादायक उदाहरण ठरले असल्याचे स्पष्ट केले आहे. उपविभागीय अधिकारी कार्यालय, ब्रह्मपुरी यांच्या या यशाबद्दल परिसरातून कौतुकाचा वर्षाव होत असून, यामुळे शासकीय सेवा अधिक गतिमान व उत्तरदायी होण्यास चालना मिळेल, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे.

❀❀❀❀❀❀❀

## श्री रंगनाथ स्वामी पतसंस्थेमार्फत सहकार दिनी वृक्षारोपण




ब्रम्हपुरी/का.प्र.

दिनांक ५/७/ २०२५ रोजी शनिवारला आंतरराष्ट्रीय सहकार वर्ष २०२५ च्या सहकार सप्ताह निमित्त श्री रंगनाथ स्वामी नागरी सह पतसंस्था वणी, शाखा ब्रह्मपुरी तर्फे वृक्षारोपण कार्यक्रम साजरा करण्यात आला.

वृक्षारोपण कार्यक्रमाला शाखा व्यवस्थापक उल्हास तामगाडगे, माजी व्यवस्थापक आनंद वसाके, शाखेतील कर्मचारी अक्षय जगनाडे, सुवर्णा दातारकर, रुक्मिणी तंवर, प्रदीप कुर्वे यांचेसह सुधन गोल्डचे राम सूर्यवंशी, सुशील थारकर, बँकेचे ठेवीदार किशोर मातीखांदे, लक्ष्मण घुटके, भीमराव ठवरे, चंद्रशेखर चौधरी, आशिष नैताम, एडलावार साहेब, महिलांमध्ये प्रतिभा तामगाडगे, रेखा घुटके , शुभांगी चौधरी, निर्मला ठाकरे, प्रिती एडलावार, धनश्री नैताम, दैनिक अभिकर्ता दिनेश बावनकुळे व मयूर दोनाडकर यांनी उपस्थिती होती.

नियमित वाचा, अर्धसाप्ताहिक ब्रम्हपुरी समाचार

# जिल्हाधिकाऱ्यांकडून ब्रम्हपुरी तालुक्यातील प्रकल्पांची पाहणी

ब्रम्हपुरी/का.प्र.

चंद्रपुर जिल्ह्याचे जिल्हाधिकारी विनय गौडा यांनी शुक्रवारी ब्रम्हपुरी तालुक्याचा दौरा



करत विविध महत्त्वाच्या विकास प्रकल्पांची प्रत्यक्ष पाहणी केली. यामध्ये पावसाळ्यात अडथळा निर्माण करणाऱ्या पुलांचे अपूर्ण काम, आरोग्य सेवा केंद्र, सौर ऊर्जा व जलशुद्धीकरण प्रकल्पांचा समावेश होता.

दौऱ्याच्या प्रारंभी अड्याळ गावगन्ना येथील प्राथमिक आरोग्य केंद्रास भेट देत पावसाळ्यात पसरू शकणाऱ्या रोगांवर उपाययोजना करण्याचे आदेश तालुका आरोग्य अधिकाऱ्यांना दिले. त्यानंतर त्यांनी भुती नाल्यावरील अपूर्ण पुलाचे काम, शहरालगत असलेल्या नॅशनल हायवेजवळील पूल, लाडज व तपाळ येथील पूल व सौर ऊर्जा प्रकल्पांची पाहणी केली, विशेषत: वडसा रोडवरील भुती नाल्यावरील पुलाचे अपूर्ण काम नागरिक व विद्यार्थ्यांसाठी त्रासदायक ठरत असल्याने संबंधित विभाग व कंत्राटदारांना काम त्वरीत पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या. आरमोरी रोडवरील रेल्वे पुलाच्या अपूर्णतेमुळे रेल्वे फाटक बंद झाल्यास वाहतूक ठप्प होण्याची शक्यता आहे. ही बाब लक्षात घेता पुलाचे काम तातडीने पूर्ण करण्याचा आदेशही त्यांनी दिला. लाडज गावातील पूल अपूर्ण असल्यामुळे मुसळधार पावसात गावाचा संपर्क तुटतो व नागरिकांना स्थलांतर करावे लागते. यामुळे लाडज पूल लवकर पूर्ण करण्याच्या सूचनाही जिल्हाधिकाऱ्यांनी दिल्या. या ठिकाणी सरपंच व ग्रामस्थांशी संवाद साधत त्यांनी समस्या जाणून घेतल्या.

नगर परिषद मुख्याधिकाऱ्यांना सांडपाणी व्यवस्थापनाबाबत कार्यवाहीचे निर्देश दिले. तपाळ येथे उभारण्यात आलेल्या उर्जा आधारित जलशुद्धीकरण प्रकल्पास भेट देत त्यांनी त्याची सविस्तर पाहणी केली. जिल्हाधिकारी विनय गौडा यांनी नागरिकांच्या समस्या प्रत्यक्ष जाणून घेतल्या व संबंधित विभागांना तातडीने उपाययोजना करून समस्या सोडविण्याचे निर्देश दिले. या दौऱ्यात उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपविभागीय अभियंता, नगर परिषद मुख्याधिकारी, नॅशनल हायवेचे अधिकारी, तालुका आरोग्य अधिकारी, गटविकास अधिकारी व पोलिस निरीक्षक यांची उपस्थिती होती.

# प्रा. मंजुषा बजाज यांचे वृक्षारोपणाचे अविरत ३७ वे वर्ष

ब्रम्हपुरी/का.प्र.

दरवर्षीप्रमाणे हयाही वर्षी प्रा. मंजुषा बजाज हयांनी वृक्षरोपनाचा कार्यक्रम आयोजित



केला. वृक्षरोपणाचे हे त्यांचे ३७ वे वर्ष आहे. मागिल ३६ वर्षांपासून गांधीनगर, शारदा कॉलनी, कहाली रोड, वखार महामंडळ, कब्रस्थान, ग्रामीण रुग्णालय, हुतात्मा स्मारक रोड, बस स्टॅंड रोड अशा अनेक ठिकाणी त्यांनी वृक्षरोपण केले.

केवळ वृक्षरोपणच नव्हे तर योग्य ती काळजी व लोकांचा सहभाग घेतला. त्यामूळे प्रत्येकच ठिकाणी आज मोठ-मोठे वृक्ष मोठया संख्येने उभे आहेत व संपूर्ण परिसर हिरवागार झाला आहे. मागित वर्षी गांधीनगर जवळील हनुमान नगरच्या लोकांनी वृक्षरोपणाची मागणी केली त्याप्रमाणे हनुमान नगर मध्ये हया वर्षीपासून वृक्षरोपण चालू केले. विविध अडचणींना तोंड देत जसे लावलेली झाडे तोडून टाकणे, झाडांना लावलेले कठडे चोरुन नेणे अशा अनेक संकटाना मात देत, जिद्द कायम ठेऊन जवळ-जवळ आज ५०० वृक्ष विविध ठिकाणी डौलाने उभे आहेत.

वृक्षारोपण कार्यक्रमप्रसंगी मेजर प्रा. विनोद नरड, प्रा. विजय मुडे, प्रा. सुभाष बजाज, ने.हि. कॉलेजचे एन.सी.सी. कॅडेट्स, निगम राऊत, दिनेश माटे, शैलेश मेश्राम आणि विकास मारबते इत्यादिनी वृक्षरोपण करुन कार्यक्रमाची शोभा वाढविली.

# आपुलकी फाऊंडेशनद्वारे शैक्षणिक साहित्याचे वितरण

नागभीड/प्रतिनिधी

गेल्या आठ वर्षांपासून शैक्षणिक क्षेत्रात कार्यरत असलेल्या आपुलकी फाउंडेशन च्या वतीने या वर्षी नवीन शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीला जिल्हा परिषद शाळेत इयत्ता पहिलीत प्रवेश करणाऱ्या नागभीड परिसरातील १४ शाळांमधील २०० विद्यार्थ्यांना स्कुलबॅग व शैक्षणिक साहित्याचे वितरण माजी जि.प. सदस्य संजयजी गजपुरे, अजय काबरा, शिवसेना तालुका प्रमुख मनोज लडके, नागभीड केंद्राचे केंद्रप्रमुख प्रभाकर करंभे सर यांच्या शुभहस्ते करण्यात आले.

सर्व शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षक तसेच आपुलकी फाउंडेशनचे पदाधिकारी उपस्थित होते.

# ब्रम्हपुरीतील वैकुंठ स्मशानभूमी मरणासन्न अवस्थेत



ब्रम्हपुरी/का.प्र.

सर्व सोयीयुक्त शहर म्हणून ब्रम्हपुरी नावाजलेली आहे. ब्रम्हपुरी शहराच्या लोकसंख्येत दिवसेंदिवस भर पडत आहे. त्यामानाने येथील नगर परिषद नागरिकांसाठी सोई सुविधा पुरविण्यात असमर्थ ठरत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. शहरातील वैकुंठ स्मशानभूमी येथे दररोज अत्यंविधी होतात. मात्र, प्रशासनाच्या दूर्लक्षामुळे ही स्मशानभूमी अत्यंत गलिच्छ झाली आहे. ब्रम्हपुरी नगर पालिकेचे अक्षम्य दुर्लक्ष होत असल्याने ब्रम्हपुरीतील वैकुंठ स्मशानभूमी मरणासन्न अवस्थेत आली आहे.

ब्रम्हपुरी नगरपालिका क्षेत्रात १० प्रभाग अस्तित्वात आहेत. यात प्रति प्रभागात दोन वार्डांचा समावेश होतो. ब्रम्हपुरी शहर हे शैक्षणिक, आरोग्य, क्रिडा व सांस्कृतिक नगरी म्हणून प्रचलित आहे. त्यामुळे येथील लोकसंख्येत आपसूकच वाढ झाली आहे. येथे जन्म-मृत्यू दराचे प्रमाणही अधिक आहे. त्यामुळे दर दिवसाआड शहरातील वैकुंठ स्मशानभूमी येथे अंत्यविधी होतात. स्मशानभूमी परिसरात सध्यास्थितीत घाणीचे साम्राज्य पसरले आहे.

अंत्यविधीसाठी वापरलेले साहित्य मोकळ्या जागेत विखुरलेले आहेत. सगळीकडे पालापाचोळा, अवास्तव वाढलेली झाडे-झुडपे, कपड्यांचे गाठोडे पडून असल्याचे वास्तव सध्यास्थितीवरून दिसून येत आहे. घाणीच्या साम्राज्यामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. त्यामुळे नागरिकांना सोई सुविधा पुरविण्याबाबत नगर पालिका प्रशासन असमर्थ ठरले असून, याचा नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. दुदैव म्हणजे ब्रम्हपुरी नगरपालिकेत ऐन पावसाच्या तोंडावर सर्वत्र घाणीचे साम्राज्य पसरले असतांना, स्वच्छता निरिक्षक पद रिक्त असणे, ही लाजीरवाणी बाब आहे. ब्रम्हपुरी नगर पालिकेत स्वच्छता निरिक्षक नसणे म्हणजे शहराला वाऱ्यावर सोडण्यासारखी परिस्थिती निर्माण झाली आहे. नगर परिषदेला स्वच्छतेविषयी कोणतेही सोयरेसुतक नसल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे ब्रम्हपुरीतील वैकुंठ स्मशानभूमी मरणासन्न अवस्थेत आली असल्याचे चिन्हे आहेत, असे नागरिकांचे म्हणणे आहे.

मलःनिस्सारण प्रकल्पाच्या कामांमुळे शहरातील अंतर्गत रस्त्यांची चाळण झाली असून, नगरपालिकेला या समस्येशी काही देणे घेणे नसल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे शहरातील अंतर्गत रस्ते तात्काळ दुरूस्त करावे व मरणासन्न अवस्थेत आलेल्या स्मशानभूमीला घाणीच्या विळख्यातून बाहेर काढून नवजीवन देण्याची मागणी सामाजिक कार्यकर्ता वासू सोंदरकर यांनी केली आहे.

... QUOTES ...

"Men are mortal. So are ideas. An idea needs propagation as much as a plant needs watering. Otherwise both will wither and die." - B.R. Ambedkar

**चारोळी**

परवा स्वप्नात दिसले
तू रथात अन् मी तुझा सारथी...
असं एकदा तरी घडावं म्हणून,
रोज करतो मी देवाची आरती...

रचनाकार : डॉ. राजन जयस्वाल

❀❀❀❀❀❀❀

# तालुक्यात ग्रा.पं. सरपंच पदाचे आरक्षण जाहीर

ब्रम्हपुरी/का.प्र.


ब्रम्हपुरी तालुक्यातील सन २०२५ ते २०३० या पंचवार्षिक कालावधीकरीता होणाऱ्या ग्राम पंचायत सार्वत्रिक निवडणूका व या कालावधीत गठीत होणाऱ्या ग्राम पंचायतीच्या निवडणुकीतील थेट सरपंच पदाचे आरक्षण निश्चित करण्याकरीता मंगळवार दि. ०८ जुलैला सभेचे आयोजन करण्यात आले होते.


त्यानुसार सन २०२५ ते २०३० या ५ वर्षाच्या कालावधीसाठी सन २०११ च्या जनगणनेनुसार अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नागरीकांचा मागास प्रवर्ग आणि खुल्या प्रवर्गातील महीलांकरीता सरपंच पदाचे आरक्षण सोडत दिनांक ८ जुलै २०२५ रोजी दुपारी २ वाजता तहसील कार्यालयातील सभागृहात सतिश मासळ तहसीलदार, ब्रम्हपुरी यांचे अध्यक्षतेखाली काढण्यात आले. सरपंच पदाचे प्रवर्ग निहाय आरक्षण पुढीलप्रमाणे आहे. **अनुसूचित जाती** करीता चिंचोली बुज. (महिला), हळदा



(महिला), सावलगांव, तुलानमेंढा (महिला), चिचगांव, चिखलगांव (महिला), पाचगांव (महिला), कहाली, कालेता (महिला), माहेर, कोसंबी खडसमारा ग्रामपंचायतींचा समावेश असून **अनुसूचित जमाती** करीता बोरगांव (महिला), अहेर नवरगांव, मालडोंगरी, तळोधी खुर्द (महिला), बेलगांव (महिला), मांगली तर **नागरीकांचा मागास प्रवर्ग** करीता रानबोथली, जुगनाळा, चांदली (महिला), लाडज (महिला), गोगांव, बरडकिन्ही (महिला), आक्सापुर (महिला), जवराबोडी मेंढा, मुई (महिला), मेंडकी, रामपुरी, मुडझा (महिला), आवळगांव (महिला), कुडेसावली (महिला), एकारा (महिला), भुज तुकूम, वांद्रा (महिला), कळमगांव, बोडधा, सायगांव या गावांचा समावेश आहे.

**सर्वसाधारण प्रवर्गा**करीता झिलबोडी, अड्याळ जाणी, चौगाण (महिला), बेटाळा (महिला), खेडमक्ता, तोरगांव खुर्द (महिला), पिंपळगांव (महिला), कान्हाळगांव (महिला), नान्होरी, दिघोरी, सोंद्री (महिला), नांदगांव जाणी (महिला), सोनेगांव (महिला), बोढेगांव, भालेश्वर (महिला), गांगलवाडी, निलज (महिला), रुई, हरदोली (महिला), सुरबोडी, रणमोचन, खरकाडा (महिला), खंडाळा, उदापुर (महिला), चांदगांव, वायगांव, बल्लारपुर माल (महिला), चोरटी (महिला), कोथुळणा (महिला), चकबोथली, पारडगांव, किन्ही (महिला), लाखापुर, तोरगांव बुज. (महिला), कोलारी, किटाळी (महिला), चिचखेडा, मरारमेंढा आदि गावातील ग्रामपंचायतच्या सरपंच पदाच्या निवडणुकीचे आरक्षण जाहिर करण्यात आले आहे. अशी माहिती सतीश मासळ तहसीलदार, ब्रम्हपुरी यांनी पत्रकातून दिली.



Miracle constructions & Developers
श्रीराम नगरी - डेव्हलपर्स
NATP प्लॉट्स उपलब्ध
सिंदेवाही
नवरगांव
तळोधी
चंद्रपुर (चौराळा)
संपर्क : अनिल दोनाडकर
मो. 8806776699, 9834946501
डुप्लेक्स बांधकाम करून मिळेल.

प्रो.प्रा. सुरेश सोरते
मो. 8698323337
सोरते स्टेनलेस स्टील वर्क्स
गीत (बुरले) पेट्रोल पंपसमोर
नागभीड रोड, ब्रम्हपुरी
रेलींग, ग्रिल व गेट
स्टिलचे नावे बनवून मिळेल.




# ब्रम्हपुरी तालुक्यात पावसाचा कहर...

(पान क्र. १ वरून)

आपत्ती व्यवस्थापन समितीद्वारे सुरक्षित ठिकाणी हलविण्याचे काम सुरू आहे. प्रशासनाच्या वतीने तालुका नियंत्रण कक्षाची स्थापना करण्यात आली असून नागरिकांच्या काही तक्रारी असल्यास त्यांनी दुरध्वनी क्रमांक ०७१७७-२७२०७३ संपर्क करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. प्रशासनाने नदीजवळील गावांना सतर्कतेचा इशारा दिला आहे. पूराच्या पाण्यामुळे शेती व घरांचे नुकसान झालेल्या नागरिकांचे प्रशासनाच्या वतीने सर्वे सुरू करण्यात आल्याची माहिती तहसिलदार सतिश मासाळ यांनी दिली.

पावसामुळे ब्रम्हपुरी शहरातील अनेक प्रभागात पाणी साचले. तसेच शहरातील नाल्या तुडूंब भरून वाहत आहेत. शहरातील प्रमुख रस्त्यांवर नाल्यांचे पाणी ओसांडून वाहत असल्यामुळे ब्रम्हपुरीतही काही भागात पूरसदृश्य परिस्थिती निर्माण झाली आहे.

# भर पावसात नगर परिषदेत भाजपाने फेकले चिखल

## शहरातील चिखलयुक्त परिस्थितीविरोधात भाजपा ब्रम्हपुरीचे तीव्र आंदोलन



ब्रह्मपुरी/का.प्र.

ब्रह्मपुरी नगर परिषद क्षेत्रात भूमिगत गटार योजनेचे काम सुरू आहे. केंद्र व राज्य सरकारने या प्रकल्पासाठी मोठा निधी ब्रह्मपुरी नगर परिषदेला दिला परंतु या कामामध्ये मोठी अनियमितता असल्याचे दिसून येते. सद्यस्थितीत शहरातील विविध भागात चिखलयुक्त परिस्थिती निर्माण झाली असून रोज नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागतो आहे. दिनांक २६ जून रोजी भाजपा शिष्टमंडळाने नगर परिषद कार्यालयात निवेदन देत सदर समस्या तातडीने दूर करण्याची मागणी केली होती. पुढील सात दिवसांत समस्या न सोडविल्यास चिखलफेक आंदोलन करण्याचा इशारा शहर अध्यक्ष प्रा. सुयोग बाळबुधे यांनी दिला होता.

सात दिवस उलटून ही नगर प्रशासनाकडून कोणतीही कार्यवाही करण्यात न झाल्याने भाजपा नेते, माजी आमदार प्रा. अतुल देशकर यांच्या मार्गदर्शनाखाली मंगळवार, दि. ०८ जुलै रोजी भारतीय जनता पार्टीच्या वतीने भर पावसात आंदोलन करण्यात आले. भर पावसात ही मोठ्या संख्येने भाजपा कार्यकर्ते, पदाधिकारी व नागरिक या आंदोलनात सहभागी झाले होते. या वेळी भाजपा पदाधिकाऱ्यांच्या वतीने शहरातील विविध भागातून जमा केले चिखल नगर परिषदेत फेकण्यात आले. यावेळी नगर परिषद प्रशासकांकडून पुढील चार ते पाच दिवसांत युद्ध पातळीवर काम करण्याचे आश्वासन देण्यात आले. आश्वासनाची पूर्तता न झाल्यास अजून तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा भाजपा शहर अध्यक्ष प्रा. सुयोग बाळबुधे यांनी यावेळी दिला.

मोर्चाची सुरूवात भाजपा कार्यालयापासून करण्यात आली. या प्रसंगी शहर अध्यक्ष सुयोग बाळबुधे, माजी अध्यक्ष अरविंद नंदूरकर, भाजपा ओबीसी मोर्चाचे प्रदेश सचिव प्रकाश बगमारे, जिल्हा सचिव साकेत भानारकर, माजी नगरसेवक मनोज वठे, माजी नगरसेवक मनोज भूपाल, विलास विखार युवा मोर्चा जिल्हा सरचिटणीस तनय देशकर, स्वप्नील अलगदेवे, दत्ता येरावार, अमित रोकडे, पवन जयस्वाल, अशोक सालोटकर, प्रा.संजय लांबे, राजू भागवत, जुंबडे सर, नितीन आंबोरकर, बंटी येरावार, दिलीप पंडित, डॉ. सुमित जयस्वाल आणि ब्रम्हपुरीतील जनता उपस्थित होती.


- ब्रम्हपुरी समाचारमध्ये जाहिरात प्रसिध्दीसाठी संपर्क करा -
महेश पिलारे मो. 9503100964
प्रा. विजय मुडे सर मो. 8275715315


Lubi PUMPS·MOTORS
बुधवार बंद
- दुकानाची वेळ - सकाळी १० ते सायं. ६ वा.
सी.आर.आय. मोटारपंपचे विदर्भातील प्रथम अधिकृत विक्रेता
गणेश ॲग्रीकल्चरल एजन्सी
रेल्वे स्टेशन रोड, खानोरकर भवन, भगतसिंग चौक, ब्रम्हपुरी
फोन नं. (07177) 272573 मोबाईल क्र. 9423115853, 7083214053
Kirloskar
CRI
ISO : 9001 : 2015 मानांकन प्राप्त दुकान
1994 पासून आपल्या सेवेत
किर्लोस्कर, एनसंस, लुबी, मोटार पंप, उषा, होन्डा, कॉमेट इंजीन, राज पी.व्ही.सी. पाईप, स्प्रिंकलर पाईप, आटा चक्की, हॅण्डपंप, केबल वायर व स्पेअर पार्टचे विक्रेता


Printed by Rajiv Pachpor published by Ashok Kisanlalji Bhaiya on behalf of Ashok Kisanlalji Bhaiya and printed at Aqua Process, Modi No.1, Sitabuldi, Nagpur and Published at Bramhapuri Samachar Office, Wadsa Road, Bramhapuri Editor Ashok Kisanlalji Bhaiya MAHMUL/2016/69789 Mob. 9422135404